**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.**
**करआकारणी व करसंकलन विभाग**

| | |
|---|---|
| परिपत्रकाचे स्वरुप | दुबार मालमत्ता हस्तांतर प्रकरणांचे हस्तांतर फी आकारणीबाबत |
| परिपत्रक क्रमांक | कर/मुख्य/९/कावि/239/२०२२, दिनांक 30/०८/२०२२ |
| विषय : | मालमत्ता हस्तांतर फी आकारणीबाबत... |
| कोणाच्या माहिती / कार्यवाहीसाठी | मालमत्ता कर आकारणी, तसेच वसूली करणारे सर्व अधिकारी / कर्मचारी |
| संदर्भ | १.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड प्रकरण ८ कराधान नियम १<br>२. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड प्रकरण ८ कराधान नियम२(३)<br>३. नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन आदेश क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४दिनांक ०३ मार्च २०२२<br>४. मा.प्रशासक यांचेकडील स्थायी समिती ठराव क्रमांक ०८,दिनांक २९/०३/२०२२<br>५. परिपत्रक क्र.कर/मुख्य/९/कावि/ ९८ /२०२२,दिनांक ०१/०४/२०२२<br>६. मा.प्रशासक यांचेकडील स्थायी समिती ठराव क्रमांक ५६९,दिनांक १२/८/२०२२<br>७.करसंकलन विभागाचा दिनांक २५/०८/२०२२ रोजीचा मंजूर प्रस्ताव |

परिपत्रक,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,करआकारणी व करसंकलन विभागामार्फत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १२७ व १२९ मधील तरतूदीनुसार मालमत्ता कराची आकारणी करणेत येते. आकारणी केलेल्या मालमत्तांची अनुसूची ड प्रकरण ८ कराधान नियमातील नियम ९ नुसार दिनांक ०१ एप्रिल २०२२ पासून दाखल होणाऱ्या सर्व प्रकारच्या हस्तांतर अर्जांवर संदर्भीय ५ चे परिपत्रकानुसार हस्तांतर फी व विलंब शुल्क आकारणीबाबतच्या सुधारित कार्यपद्धतीचे परिपत्रक निर्गत करून त्याची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

मालमत्ता हस्तांतर प्रकरणी संदर्भ ५ चे दिनांक ०१ एप्रिल २०२२ रोजीचे परिपत्रकानुसार कार्यवाही करीत असताना ज्या मालमत्तांची खरेदी/विक्री दोन किंवा त्यापेक्षा जास्त वेळा झालेली आहे आणि त्याची हस्तांतर प्रक्रिया करसंकलन विभागाकडे झालेली नाही(ज्या हस्तांतर प्रक्रियाच्या नोंदी आकारणी पुस्तकामध्ये नाहीत) अशा प्रकरणांमध्ये हस्तांतर फी शुल्क हे हस्तांतरण प्रक्रिया झालेल्या दोन किंवा त्यापेक्षा जास्त खरेदी/विक्रीचे प्रमाणात घ्यावयाची किंवा कसे याबाबतच्या अडचणी विचारात घेऊन संदर्भ क्रमांक ६ चे मंजूर ठरावानुसार खालीलप्रमाणे हस्तांतर फी वसूल करावी.

1. दिनांक ०१ एप्रिल २०२२ पासून नव्याने प्राप्त होणा-या मालमत्ता हस्तांतरण प्रकरणी संदर्भ ५ चे हस्तांतर परिपत्रकानुसार हस्तांतर फी वसूल करणेत यावे.

2. तथापि अ.क्र. १ नुसार दाखल झालेल्या अशा अर्जदाराचे मालमत्ता हस्तांतर प्रकरणी अशा मालमत्तेचे दिनांक ३१ मार्च २०२२ पूर्वी एकापेक्षा जास्त वेळा हस्तांतर प्रक्रिया झाली आहे, परंतु मनपा दप्तरी अशा मालमत्तेचे हस्तांतर झाले नसल्यास अशा प्रकरणी दिनांक ३१ मार्च २०२२ पूर्वीचे करयोग्यमूल्यावर आधारित हस्तांतर फी वसूली धोरणानुसार हस्तांतर फी वसूली करावी. (उदा. मालमत्ता आकारणी रजिस्टरला "अ" ची नोंद आहे. "अ" व्यक्तीने "ब" व्यक्तीला व "ब" व्यक्तीने "क" व्यक्तीला तसेच "क" व्यक्तीने "ड" व्यक्तीला मालमत्ता हस्तांतर केले आहे. अशा प्रकरणी "ड" व्यक्तीने अर्ज केला असल्यास "ड" व्यक्तीकडून संदर्भ क्रमांक ५ नुसार हस्तांतर फी अधिक "ब" व "क" व्यक्तींची ३१ मार्च २०२२ पूर्वी झालेली हस्तांतर प्रक्रिया मनपा दप्तरी झाली नसल्याने "ब व "क" ची करयोग्यमूल्यावर आधारित हस्तांतर फी अशी एकत्रित वसूल झाल्यानंतर "ड" व्यक्तीचे नावे हस्तांतर होईल.)

कृ.मा.प..

3. मात्र अ.क्र. १ नुसार दाखल झालेल्या अशा अर्जदाराचे मालमत्ता हस्तांतर प्रकरणी अशा मालमत्तेचे दिनांक ०१ एप्रिल २०२२ नंतर एकापेक्षा जास्त वेळा हस्तांतर प्रक्रिया झाली आहे, परंतु मनपा दप्तरी अशा मालमत्तेचे हस्तांतर झाले नसल्यास अशा प्रकरणी संदर्भ क्रमांक ५ चे परिपत्रकानुसार हस्तांतर फी वसूलीस पात्र राहिल.

4. हस्तांतर प्रकरणी कार्यवाही करताना हस्तांतर फी रक्कम वगळता अन्य कार्यपद्धती पूर्वी प्रमाणेच राहील.

5. संगणक प्रणालीमध्ये जुनी व नवीन हस्तांतर फी शुल्क कार्यप्रणाली चालू ठेवणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर परिपत्रक सर्व अधिकारी /कर्मचारी यांचे निदर्शनास आणून देणेत यावे.

(जितेंद्र वाघ)
अतिरिक्त आयुक्त (२)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८

प्रति – सर्व करसंकलन विभागीय कार्यालय

प्रत - १.लेखा विभाग

२. माहिती व तंत्रज्ञान विभाग / TECH - 9

२/- परिपत्रकामध्ये नमूद केलेनुसार संगणक आज्ञावलीमध्ये योग्य ते बदल करावेत.